# 23 डिसेंबर

## आजचा सुविचार :

“कम्फर्ट झोनमधून बाहेर पडा,जेव्हा आपण काहीतरी नवीन करून पहाण्यासाठी तयार असाल तेव्हाच आपण पुढे जाऊ शकता.”

## आजचे पंचांग :

| | |
|---|---|
| वार – गुरुवार | दिनांक : 23 डिसेंबर 2021 |
| तिथी – मार्गशीर्ष | नक्षत्र – आश्लेषा |
| सुर्योदय – सकाळी 6.55 वाजता | सूर्यास्त – सायंकाळी 6. 07 वाजता |

## आजचे दिनविशेष :

2001 : बिहारमधील चंपारण्य जिल्ह्यातील केसरिया गाव येथे जगातील सर्वात मोठा बौद्ध स्तूप सापडला. त्याची उंची 104 फूट आहे.

2000 : कलकत्ता शहराचे नाव ’कोलकता’ असे बदलण्यास केंद्र सरकारची मंजुरी

1940 : वालचंद हिराचंद यांनी बंगळुरु येथे ‘हिन्दुस्थान एअरक्राफ्ट‘ हा कारखाना सुरू करून भारतातील विमान निर्मिती उद्योगाची मुहूर्तमेढ रोवली.

1921 : शांतिनिकेतन येथे ’विश्व भारती’ विश्वविद्यालयाची स्थापना.

## आजचे इंग्लिश शब्द :

1) Rabbit – ससा 2) Bear - अस्वल 3) Leopard – बिबट्या 4) Fox – कोल्हा

## आजची प्रश्नमंजुषा :

1) आपल्या घरात पाणी कोठून येते?

2) पाच पाळीव प्राण्यांची नावे सांगा.

3) इंग्लीशमध्ये स्वर किती आहेत? ते कोणकोणते?

4) 16 चे अवयव सांगा.

## बोधकथा :

### निळा राजा

एका जंगलामध्ये एक लांडगा राहत होता. तो लांडगा स्वत: चा जीव वाचवण्यासाठी जंगलातून बाहेर जोरात पळत होता. भटकी कुत्री त्याचा पाठलाग करीत होती. जीवाच्या आकांताने धावणारा लांडगा गावाच्या एका टोकाला राहणाऱ्या घरात जाऊन पोहचला. ते घर गावातील लोकांचे कपडे धुणाऱ्या परटाचे होते.त्या परटाने कपड्यांना नीळ देण्यासाठी एका मोठ्या भांड्यात भरपूर नीळ आणि पाणी एकत्र करून ठेवले होते. लांडगा परीटाच्या घरात पोहचला आणि त्याने सरळ खिडकीतून घरात उडी मारली. लांडग्याची उडी नेमकी निळीच्या भांड्यात पडली. लांडगा त्या भांड्यात लपून बसला. पाठलाग करणारी कुत्री घराबाहेर घुटमळली आणि

थोड्या वेळाने निघून गेली.

सकाळ होताच लांडगा घरा  बाहेर पडला आणि जंगलात पळून आला. आपला रंग निळा झाला आहे हे त्याला माहितच नव्हते. लांडगा जंगलात पोहताच त्याला बघून अनेक प्राणी पळून गेले. निळ्या रंगाचा प्राणी ते प्रथमच  बघत होते. लांडग्याला काहीच समजत नव्हते कि हे  सगळे प्राणी आपल्याला का घाबरत आहेत ?

नदीजवळ जाताच लांडग्याने स्वत:चे प्रतिबिंब पाण्यात बघितले त्याला आश्चर्याचा धक्काच बसला. स्वत:चे निळे प्रतिबिंब बघून त्याला समजले कि जंगलातील प्राणी आपणास का घाबरत आहेत ते..!

सर्व घाबरलेल्या प्राण्याचा लांडगा राजा झाला आता त्याचे दिवस मजेत चालले होते. एके रात्री जंगलातले काही लांडगे एकत्र आले आणि जोरजोरात आरोळ्या ठोकू लागले. 'निळा लांडगा' स्वत:चे राजेपण विसरून ओरडू लागला. निळ्या लांडग्याचा आवाज ऐकताच जंगलातील सर्व प्राण्यांना त्याचे खरे रूप कळले. आपण मूर्ख बनलो हे  प्राण्यांना कळले सर्व प्राणी एकत्र आले आणि त्यांनी त्या लांडग्याला जंगलाबाहेर हुसकून लावले.

तात्पर्य - असत्य जास्त काळ टिकत नाही